26 JUL 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गडहिंग्लज : कलर्स ॲवॉर्ड मिळालेले क्रीडा शिक्षक यांच्यासह विद्यार्थिनी.

# 'शिवराज'च्या राहुल मगदूम यांच्यासह सहा खेळाडूंचा सन्मान

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

जयपूर येथे झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत महिला व पुरुष संघांचे व्यवस्थापन करून शिवाजी विद्यापीठाला दोन सुवर्णपदक मिळवून दिली. त्याबद्दल शिवराज महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. राहुल मगदूम यांच्यासह सह खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कलर्स ॲवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री (सांघिक) स्पर्धेत रौप्यपदक विजेती सृष्टी रेडेकर, पंजाब येथील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेत कास्यपदक विजेते आरती जाधव, ऋतुजा पाटील, स्नेहल पाटील, जयपूर राजस्थान येथील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब (सांघिक) स्पर्धेत सुवर्णपदक विजेते समीक्षा गावडे व प्राजक्ता गावडे आदींना कलर्स ॲवॉर्ड देण्यात आला. त्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ.अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, प्राचार्य डॉ.एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2025
लोकमत

# जे. जे. मगदूम अभियांत्रिकीच्या ३२ विद्यार्थ्यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**जयसिंगपूर :** येथील डॉ. जे.जे. मगदूम अभियांत्रिकीच्या कॉम्प्युटर, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व ई.टी.सी. विभागातील ३२ विद्यार्थ्यांची क्यूस्पायडर कनेक्ट या सॉफ्टवेअर कंपनीत नोकरीसाठी निवड झाली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. गोपाळ मुलगुंड यांनी दिली.

यामध्ये अनुराग कुरणे, महावीर मगदूम, तनुश्री शिंदे, प्रणव शिखरखाने, ऋषिकेश घोडके, आकांक्षा गायकवाड, सानिका मोहिते, दीपाली झिटे, शर्वरी कुलकर्णी, प्रथमेश गोडसे, वृषाली माळी, वैष्णवी चव्हाण, रणजीत पाटील, निकिता धोंड, श्रावणी पट्टणशेट्टी, आर्यन पाटील, तेजस रंगत, वैभव चव्हाण, ओमकार तिबिले, दक्षा निकम, रोहन सावंत, प्रथमेश राऊत, प्रज्ञा वासुदेव, सलोनी देसाई, सानिका पाटील, श्रेयश देशमाने, भारत कुंडेकर, साक्षी कोळेकर, अंतरी इंदलकर, अभिषेक मगदूम, सुयोग मोहिते, अथर्व दिवटे यांचा समावेश आहे.

शैक्षणिक वर्षात दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी देण्यात महाविद्यालय यशस्वी झाले आहे. संस्थेस मिळालेला स्वायत्त दर्जा व एन.इ.पी. अंतर्गत शिवाजी विद्यापीठ संलग्नित अभ्यासक्रमाचा फायदा भविष्यात विद्यार्थ्यांना होईल अशी माहिती ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा. सौरभ खानावळे यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय मगदूम, उपाध्यक्षा ॲड. डॉ. सोनाली मगदूम, डॉ. सुनील आडमुठे यांनी सत्कार केला. (वा.प्र.)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2025

पुण्यनगरी

# 'शिवराज 'मध्ये करिअर संधीबाबत मार्गदर्शन

**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयात वाणिज्य मंडळाच्या वतीने भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. कदम होते. शिवराज विद्या संकुलाचे सचिव डॉ. अनिल कुराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. डी. पी. खेडकर यांनी स्वागत केले. यावेळी गुरव यांनी पदवी आणि नोकरी यातील फरक काय आहे, याबाबत माहिती दिली. कार्यक्रमास डॉ. एम. व्ही. राजे, डॉ. एस. डी. सावंत, डॉ. बी. एम. जाधव, प्रा. सचिन चौगुले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. बी. बी. वाटंगी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. डी. चौगुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2025
तरूण भारत

# 'एकात्म मानव दर्शन' कार्यक्रम सर्व महाविद्यालयात होणार

**कोल्हापूर :** राज्याचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे ओएसडी पंकज पाठक यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. त्यांच्या उपस्थितीत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शन कार्यक्रमासंदर्भात बैठक झाली. हा कार्यक्रम विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात होणार आहे. यासाठी शासनाची समिती नेमली आहे. जिल्हाधिकारी अमोल येडगे कोल्हापूरच्या समितीचे अध्यक्ष आहेत.